05 DEC 2021 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या शैक्षणिक धोरणाचे आव्हान पेलणे शक्य

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरण हे शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक संस्था सक्षम बनविण्यासाठी येऊ घातले आहे. नजीकच्या काळात संशोधन करणारी विद्यापीठे आणि विद्यादान करणारी विद्यापीठे असे विभाजन होण्याची शक्यता आहे. त्यासाठी जास्तीत जास्त स्वायत्त महाविद्यालये तयार होऊन त्यांची जबाबदारी वाढेल. नव्या शैक्षणिक धोरणाची आव्हाने पेलणे शक्य आहे, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.




**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय कॉन्क्लेव्हच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, शुभांगी गावडे. (छाया : पप्पू अत्तार)**

विवेकानंद कॉलेजच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभागातर्फे राष्ट्रीय 'शैक्षणिक धोरण २०२० आव्हाने व अंमलबजावणी' या विषयावरील राष्ट्रीय कॉन्क्लेव्हच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. ऑनलाईन बीजभाषणात नॅक सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील म्हणाले, नॅशनल ॲकॅडमिक डिपॉझिटरी ही संकल्पना नवीन शैक्षणिक धोरणाचा एक भाग आहे. याचा शिक्षकांनी अभ्यास करून त्यातील अडचणींवर मात करून त्यातून सुवर्णमध्य काढावा. दुसऱ्या सत्रात कर्नाटकातील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. एस. बी. बिरादार यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी स्वागत केले. बैठकीचे कार्यवाहक डॉ. एस. आर. कट्टीमणी यांनी प्रास्ताविक केले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी आभार मानले. प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

0 5 DEC 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात दिव्यांग दिन : ऑनलाईन कार्यक्रम

# दिव्यांगांना सर्वसामान्यांहून वेगळे समजणे चुकीचे : बडवे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दिव्यांग, विशेष दृष्टी मुलांना सर्वसामान्यांहून वेगळे समजणे चुकीचे आहे. सामाजिक पातळीवर त्यांना समजून घेऊन मुख्य प्रवाहात सक्षमपणाने सामील होण्यासाठी मदत करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन पुणे येथील निवांत अंध मुक्त विकासालयाच्या संस्थापक-संचालक मीरा बडवे यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलीटीज् आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित विशेष ऑनलाइन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



मीरा बडवे



सोनाली नवागुंळ

अद्ययावत तंत्रज्ञानाचा, माहिती-तंत्रज्ञानाचा आधार घेऊन दिव्यांगांसाठी सहाय्यकारी असा स्वरूपाची साधने, सुविधांची निर्मिती करून त्यांचे जगणे सुकर होण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षांसह जीवनाच्या विविध परीक्षांनाही सामोरे जाण्यासह त्यांना सक्षम करण्यासाठी मदतीची आवश्यकता आहे. त्यासाठी चिरंतन चालणारी व्यवस्था निर्माण करण्याची गरज असल्याचे बडवे यांनी सांगितले.

## ७८ नातवंडांची आजी

'निवांत'मधून हजारो मुले शिकून बाहेर पडली आणि आज किमान ७८ नातवंडांची मी आजी आहे. या दिव्यांग मुलांना संस्थेपेक्षा कुटुंबाची गरज अधिक असते, असे बडवे यांनी सांगितले.

दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ तत्पर आणि संवेदनशील असल्याचा मला वैयक्तिक अनुभव आहे. आपल्या वेगळ्या जगण्याचा विद्यापीठाच्या व्यासपीठावरून परामर्ष घेण्याची मिळालेली संधी खूप महत्त्वाची आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काही नवे उपक्रम विद्यापीठाच्या माध्यमातून उभे करू या, जे राज्य आणि देशभरात आदर्शवत ठरेल. हातात हात घालून चांगल्या कामांसाठी एकत्रपणाने उभे राहू या, असे आवाहन लेखिका सोनाली नवांगुळ यांनी केले. दिव्यांग व्यक्तींना सहानुभूतीची नव्हे, तर समान हक्क, अधिकार प्रदान करण्याची आवश्यकता आहे, हे मीरा बडवे यांच्या व्याख्यानातून अधोरेखित झाले असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, अजित चौगुले, डॉ. जगन कराडे उपस्थित होते.

पुढारी

# प्रा. वसंत पाटणकर यांना डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठातर्फे दिला जाणारा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक, कवी, प्रा. वसंत पाटणकर यांना जाहीर झाला आहे. ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, ग्रंथ भेट असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार वितरण समारंभ २९ जानेवारी २०२२ रोजी ज्येष्ठ विचारवंत डॉ. गणेश देवी यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती कुलगुरू प्रा.डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली

प्रा. पाटणकर मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातून विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले आहेत. 'विजनातील कविता' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. कविता साहित्य प्रकाराची तात्त्विक व उपयोजित समीक्षा त्यांनी लिहिली. 'कविता : संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा' व 'कवितेचा शोध' या ग्रंथातील त्यांची समीक्षा मौलिक ठरली आहे. कवी ग्रेस व नामदेव ढसाळ या कवींबरोबरच साठनंतरच्या मराठी कवितेची त्यांची समीक्षा साक्षेपी व चिकित्सक ठरली आहे. ग. स. भाटे, द. ग. गोडसे, अरुण कोल्हटकर यांच्यावरील त्यांची संपादने महत्त्वाची ठरली आहेत. पुरस्कार निवड समितीचे सदस्य म्हणून रंगनाथ पठारे, डॉ. राजन गवस व डॉ.अविनाश सप्रे यांनी काम पाहिले.

05 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्येष्ठ नागरिकांना अर्थसाक्षरतेचे धडे

## भगवान महावीर अध्यासनच्या वतीने कार्यशाळा : डॉ. विजय ककडे यांनी केले मार्गदर्शन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

घसरणारे व्याजदर आणि वाढती महागाईच्या कात्रीत सापडणाऱ्या ज्येष्ठांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या वतीने अर्थसाक्षरता कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत केंद्राचे संचालक डॉ. विजय ककडे यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कसे अर्थसाक्षर झाले पाहिजे, यासंदर्भात मार्गदर्शन केले. चैतन्य हास्यक्लब राजारामपुरी गार्डनमध्ये झाली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित केलेल्या अर्थसाक्षरता कार्यशाळेला उपस्थित ज्येष्ठ महिला व पुरूष.**

डॉ. विजय ककडे म्हणाले, नव्या तंत्राचा वापर विशेषतः मोबाइल आणि इंटरनेटमार्फत फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. नवतंत्रज्ञानाच्या वापराबाबत सावधगिरी बाळगली पाहिजे. तसेच आपली गुंतवणूक सुरक्षित कशी ठेवावी याबाबत त्यांनी माहिती दिली. भविष्यात व्याजदर आणखी घसरणार असून आपली गुंतवणूक केवळ एकाच माध्यमात न करता ती जोखीम कमी करण्याच्या दृष्टीने करावी. शारीरिक आरोग्याबरोबरच आर्थिक आरोग्य देखील संपन्न ठेवावे असेही ते म्हणाले.

कार्यशाळेचे समन्वयक एन. एम. पाटील-सांगवडेकर यांनी प्रस्ताविक केले. अशा कार्यशाळा सर्व ज्येष्ठ नागरिकांसाठी घ्याव्या, अशी अपेक्षा जयंत पाटील यांनी व्यक्त केली. या कार्यशाळेला ज्येष्ठ महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 5 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराज महाविद्यालयाला विजेतेपद

## आंतरविभागीय रोप मल्लखांब स्पर्धा; मुलांत वारणानगर विजेता

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाची आंतरविभागीय रोप मल्लखांब स्पर्धा झाली. मुलींच्या गटात येथील शिवराज महाविद्यालयाने तर मुलांच्या गटात यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाने (वारणानगर) विजेतेपद पटकाविले. येथील शिवराज महाविद्यालयात झालेल्या स्पर्धेत कोल्हापूरसह सांगली व सातारा जिल्ह्यातील संघ सहभागी झाले होते.




**गडहिंग्लज : आंतरविभागीय रोप मल्लखांब स्पर्धेतील विजेत्या शिवराज महाविद्यालयाला पारितोषिक देताना रमेश रिंगणे. शेजारी नारायण कुराडे, डॉ. एस. एम. कदम, डॉ. अनिल कुराडे आदी.**

स्पर्धेतील अनुक्रमे विजेते असे- (मुली)- शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज, आजरा महाविद्यालय आजरा, डॉ. घाळी महाविद्यालय गडहिंग्लज. (मुले)- यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय पेठवडगाव, शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज. (वैयक्तिक मुली)- पल्लवी शिंदे (किसन वीर महाविद्यालय वाई), पल्लवी मोरे (डी. जी. पाटील महाविद्यालय सातारा), सिद्धी चव्हाण (किसनवीर महाविद्यालय वाई). (मुले)- शुभम लगडे (यशवंतराव चव्हाण महाविद्यालय), कुणाल दरवान (विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर), रवींद्र पाटील (छत्रपती शिवाजी महाविद्यालय सातारा), रमेश रिंगणे, शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, ॲड. सतीश इटी, राजू मोळदी, मल्लखांब फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव नारायण कुराडे, शिवराजचे सचिव डॉ. अनिल कुराडे, संचालक बसवराज आजरी, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. क्रीडा विभाग प्रमुख प्रा. राहुल मगदूम, प्रा. जयवंत पाटील, प्रशिक्षक रतन जाधव यांच्यासह सहकाऱ्यांनी स्पर्धा पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

05 DEC 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहाजी महाविद्यालयाच्या सानिया सासने, गौरव जाधवला सुवर्णपदक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय निवड चाचणी बॉक्सिंग स्पर्धेत शहाजी महाविद्यालयाच्या सानिया सासने हिने ७० ते ७५ किलो वजनी गटात, तर गौरव जाधवने ४६ ते ४८ वजनी गटात सुवर्णपदक पटकावले.

बॉक्सिंग

शिवाजी विद्यापीठ व शहाजी छत्रपती महाविद्यालयातर्फे शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात तीन जिल्ह्यांतील ४५ महाविद्यालयाच्या १५० खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, राज्य बॉक्सिंग संघटनेचे उपाध्यक्ष भरत कुमार व्हावळ, शहर बॉक्सिंग संघटनेच्या आरती कामते यांच्या हस्ते झाले. स्पर्धेचे संयोजन जिमखानाप्रमुख प्रा. प्रशांत पाटील, क्रीडाशिक्षक प्रशांत मोटे यांनी केले.

05 DEC 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अडचणींना तोंड देत नावीन्य शोधा

## रवींद्र कोल्हे : कुंडल येथील कार्यक्रमात क्रांतिअग्रणी पुरस्काराने सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**पलूस** : कठीण प्रसंग आयुष्याला झळाळी देण्यासाठीच येत असतात. त्यामुळे अडचणींना तोंड द्या आणि नावीन्याचा शोध घ्या, असे आवाहन मेळघाटातील आदिवासींना केवळ एका रुपयात आरोग्यसेवा देणारे ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र कोल्हे यांनी शनिवारी केले.

कुंडल (ता. पलूस) येथे क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या जन्मशताब्दीनिमित्त डॉ. कोल्हे यांना 'क्रांतिअग्रणी पुरस्कार' शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. एक लाख रुपये, मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी आ. अरुण लाड, जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, अर्थतज्ज्ञ प्रा. जे. एफ. पाटील, ॲड. सुभाष पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



कुंडल (ता. पलूस) येथे शनिवारी डॉ. रवींद्र कोल्हे यांना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते 'क्रांतिअग्रणी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यावेळी आ. अरुण लाड उपस्थित होते.

डॉ. कोल्हे म्हणाले, समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देणे आणि त्यांच्या अडचणी सोडविणे यालाच धर्म म्हणतात. याच धर्माचे पालन मी आजवर करीत आहे. वैद्यकीय शिक्षण घेताना मित्रांसोबत काढलेल्या सायकल सफारीदरम्यान खऱ्या ग्रामीण भागाचे दर्शन झाले. याच प्रवासात खऱ्या जीवनाचा साक्षात्कार झाला. चिरंतन असे काहीच नाही, कोणतेही दिवस बदलण्यासाठीच आलेले असतात, त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत खचून जाऊ नका. आपल्या कामाशी प्रामाणिक रहा.

आ. लाड म्हणाले, क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांनी केलेला त्याग नवीन पिढीला माहिती व्हावा म्हणून समाजात अलौकिक काम करणाऱ्या व्यक्तींना क्रांतिअग्रणी पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

प्राचार्य डॉ. प्रताप लाड यांनी स्वागत केले. जयवंत आवटे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. श्रीकांत माने यांनी मानपत्राचे वाचन केले. कुंडलिक एडके यांनी आभार मानले.

यावेळी ॲड. प्रकाश लाड, उद्योजक उदय लाड, दिलीप लाड, सचिन कदम, जिल्हा परिषद सदस्य शरद लाड, नितीन नवले, प्रमिला लाड, अलका लाड, मीनाक्षी लाड, सुनंदा लाड, धनश्री लाड, साधना लाड, सरपंच प्रमिला पुजारी, सुरेश खारगे, प्राचार्य बी. एन. पवार, व्ही. वाय. पाटील आदी उपस्थित होते.

### भौतिक गोष्टींचा हव्यास तात्पुरता : डी. टी. शिर्के

डॉ. शिर्के म्हणाले, भौतिक गोष्टींचा हव्यास तात्पुरता असतो. वैद्यकीय सेवा देतानाही साधी राहणी जपता येते, हे डॉ. कोल्हे यांनी समाजाला दाखवून दिले आहे.

0 5 DEC 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आदिवासीच खऱ्या अर्थाने सुधारलेले लोक

## ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र कोल्हे यांचे मत; कुंडल येथे क्रांतिअग्रणी पुरस्कार प्रदान

**कुंडल : पुढारी वृत्तसेवा**

आदिवासी समाज गरीब असला तरी मनाने समृद्ध आहे. आदिवासी भागात वृद्धाश्रमाची गरजही नाही. आदिवासी मागासलेले नसून खऱ्या अर्थाने सुधारलेले आहेत, असे मत ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रविंद्र कोल्हे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते डॉ. कोल्हे यांना क्रांतिअग्रणी पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार अरूणअण्णा लाड, अॅड. प्रकाश लाड, उद्योजक उदय लाड, दिलीप लाड, जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड, जिल्हा परिषद गटनेते शरद लाड, रणजित लाड उपस्थित होते.

डॉ. कोल्हे म्हणाले, क्रांतिअग्रणी पुरस्कार मला दिला हा तुमच्या सर्वांचा मोठेपणा आहे. हा पुरस्कार मी मेळघाटातील आदिवासींना समर्पित करतो. महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव बालवयातच माझ्या मनावर झाला. आचार्य विनोबा भावे यांना जवळून पाहता आले. त्यांच्या विचारांचा प्रभावही झाला. आयुष्यात कठीण प्रसंगाना तोंड दिल्यानेच चांगले दिवस आले. बैरागडमधील आलेले कठीण प्रसंग हे चॅलेंज म्हणून स्वीकारत गेलो. लोकांच्या अडचणी समजून घेत त्या प्रामुख्याने सोडवत गेलो. रोजगारहमीच्या कामामुळे बैरागडच्या जनतेची पोटाची भूक भागली. सर्वसामान्य जनतेचे अनेक प्रश्न सरकार दरबारी मांडले. त्यामुळे आदिवासींचे आरोग्य सुधारण्यात मोठी मत झाली.




**कुंडल : येथे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते क्रांतिअग्रणी पुरस्कार स्वीकारताना ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र कोल्हे. सोबत आमदार अरूणअण्णा लाड.**

ते पुढे म्हणाले, आदिवासींनी नक्षलवाद्यांना साथ दिली नसल्याने मेळघाट परिसर नक्षलग्रस्तांपासून मुक्त आहे. शेतीमध्येही अनेक बदल करून स्थानिकांना शेतीकडे वळवण्यात यश मिळाले. त्यामुळे मेळघाटातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या नाहीत.

आमदार लाड म्हणाले, क्रांतिअग्रणी बापूंनी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वसामान्य जनतेसाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. कष्टकरी, गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी अनेक लढे दिले.

डॉ. जी. डी. बापू लाड व क्रांतिविरांगणा विजयाताई लाड यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. उद्योजक उदय लाड, दिलीप लाड, व्ही. वाय. पाटील, सरपंच प्रमिला पुजारी, प्रमिलाताई लाड, सुनंदाताई लाड, घनश्रीताई लाड, श्रीकांत लाड, वसंतराव लाड, क्रांतीचे कार्यकारी संचालक चंद्रकांत गव्हाणे, अॅड. सुभाष पाटील, प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, उद्योजक सचिन कदम उपस्थित होते. प्रा. डॉ. प्रताप लाड यांनी प्रास्ताविक केले. जयवंत आवटे यांनी परिचय करून दिला. मानपत्र वाचन श्रीकांत माने यांनी केले. कुंडलिक एडके यांनी आभार मानले.

05 DEC 2021
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मनाच्या वेदना दूर करण्यासाठीच संघर्ष

## डॉ. रवींद्र कोल्हे; डॉ. जी. डी. बापू लाड जन्मशताब्दीनिमित्त क्रांतिअग्रणी पुरस्कार प्रदान

सकाळ वृत्तसेवा

कुंडल, ता. ४ : माणसाच्या अंगाला, कपड्याला लागलेला चिखल स्वच्छ करता येतो; मात्र मनाला झालेल्या वेदना स्वच्छ करता येत नाहीत. लोकांच्या याच वेदना दूर करण्यासाठीच गेली ३७ वर्षे आपला संघर्ष सुरू आहे. यामध्ये आपण यशस्वी झालो हे मोठे समाधान आहे, असे प्रतिपादन डॉ. रवींद्र कोल्हे यांनी केले.



कुंडल : क्रांतिअग्रणी पुरस्कार ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र कोल्हे यांना प्रदान करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, बाजूस आमदार अरुण अण्णा लाड.

येथे क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या जन्मशताब्दीनिमित्त क्रांतिअग्रणी पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. त्या पुरस्काराला उत्तर देताना ते बोलत होते. या पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये, मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ असे होते. यावेळी आमदार अरुण अण्णा लाड, जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, प्रा. जे. एफ. पाटील, अॅड. सुभाष पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. कोल्हे म्हणाले, ''मेळघाटात अनेक गोष्टी या लोकांभिमुख केल्या जातात, त्यामुळे शेतकरी आत्महत्या अजिबात नाहीत. समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देणे आणि त्यांच्या अडचणी सोडवणे यालाच धर्म म्हणतात आणि याच धर्माचे पालन मी आजवर करत आहे. वैद्यकीय शिक्षण घेताना मित्रांसोबत काढलेल्या सायकल सफारी दरम्यान खऱ्या ग्रामीण भागाचे दर्शन झाले, याच प्रवासात खऱ्या जीवनाचा साक्षात्कार झाला. चिरंतन असे काहीच नाही, कोणतेही दिवस बदलण्यासाठीच आलेले असतात. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत खचून जाऊ नका, आपल्या कामाशी प्रामाणिक राहिले पाहिजे.''

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ''माणसांनी माणसासारखे वागले पाहिजे, भौतिक गोष्टींचा हव्यास तात्पुरता असतो, पण चिरंतन हे व्यक्तिमत्त्व असते ते सुधारले पाहिजे. वैद्यकीय सेवा पुरवताना ही साधी राहणी जपली जाते. हे डॉ. कोल्हेंनी समाजाला दाखवून दिले.'' अरुण लाड यांनी पुरस्काराबाबतची भूमिका सांगितली, ते म्हणाले, ''क्रांतिअग्रणी जी.डी.बापू यांनी स्वातंत्र्यासाठी प्रचंड त्याग केला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही बापू सर्वसामान्यांच्या सुखासाठी लढत राहिले. बापू जे जीवन जगले तेच डॉ. रवींद्र कोल्हे जीवन जगत आहेत. डॉ. कोल्हे हे नि:स्पृह भावनेने आदिवासी भागात लोकांची सेवा करत आहेत. समाजाची सेवा हेच जीवन समजून ते आयुष्यभर कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची समाजाला प्रेरणा मिळावी याच भूमिकेतून डॉ. कोल्हे यांना हा पुरस्कार दिला आहे.''

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रताप लाड यांनी केले, परिचय जयवंत आवटे यांनी केले, निवेदन व मानपत्र वाचन श्रीकांत माने यांनी केले, तर आभार कुंडलिक एडके यांनी मानले.

यावेळी अॅड. प्रकाश लाड, उद्योजक उदय लाड, दिलीप लाड, सचिन कदम, जिल्हा परिषद सदस्य शरद लाड, प्रमिलताई लाड, अलकाताई लाड, मीनाक्षीताई लाड, सुनंदाताई लाड, धनश्रीताई लाड, साधना लाड, अंजली कदम, मनस्वीता पाटील, अपेक्षा लाड, व्ही. वाय. पाटील, सुरेश खारगे, यांच्यासह क्रांती कारखान्याचे संचालक, कर्मचारी, ग्रामपंचायत सदस्य, सर्व संस्थांचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

# समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देणे : डॉ. रवींद्र कोल्हे

**केसरी वृत्तसेवा**

**कुंडल** : मेळघाटात अनेक गोष्टी या लोकाभिमुख केल्या जातात, त्यामुळे तिथे आत्महत्या अजिबात नाहीत. समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देणे आणि त्याच्या अडचणी सोडवणे, यालाच धर्म म्हणतात आणि याच धर्माचे पालन मी आजवर करत आहे, असे प्रतिपादन डॉ. रवींद्र कोल्हे यांनी केले.

कुंडल (ता.पलूस) येथे क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. (बापू) लाड यांच्या जन्मशताब्दी निमित्त क्रांतिअग्रणी पुरस्कार डॉ. कोल्हे यांना प्रदान करण्यात आला . डॉ. कोल्हे हे मेळघाट या दुर्गम भागातील बैरागड येथे पत्नी स्मिता कोल्हेच्या सहाय्याने केवळ एक रुपयात वैद्यकीय सेवा पुरवत आहेत आणि आपली समाजाप्रती कर्तव्य बजावत आहेत म्हणून त्यांना हा पुरस्कार दिला गेला. या पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये, मानचिन्ह, मानपत्र,शाल, श्रीफळ असे होते.



**क्रांतीअग्रणी पूरस्कार ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रविंद्र कोल्हे यांना प्रदान करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ डी टी शिर्के, बाजूस आमदार अरुण अण्णा लाड.**

यावेळी आमदार अरुणअण्णा लाड, जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, प्रा. जे. एफ. पाटील, ॲड. सुभाष पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. कोल्हे म्हणाले, वैद्यकीय शिक्षण घेताना मित्रांसोबत काढलेल्या सायकल सफारी दरम्यान खऱ्या ग्रामीण भागाचे दर्शन झाले. याच प्रवासात खऱ्या जीवनाचा साक्षात्कार झाला. चिरंतन असे काहीच नाही, कोणतेही दिवस बदलण्यासाठीच आलेले असतात, त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत खचून जाऊ नका. आपल्या कामाशी प्रामाणिक राहिले पाहिजे. आयुष्यातील सगळे कठीण प्रसंग हे आपल्या आयुष्याला झळाळी देण्यासाठीच येत असतात त्यामुळे अडचणींना तोंड द्या आणि नाविन्याचा शोध घ्या

यावेळी कुलगुरू डॉ . डी. टी . शिर्के म्हणाले, माणसांनी माणसासारखे वागले पाहिजे, भौतिक गोष्टींचा हव्यास तात्पुरता असतो पण चिरंतन हे व्यक्तिमत्व असते ते सुधारले पाहिजे. वैद्यकीय सेवा पुरवताना ही साधी राहणी जपली जाते, हे डॉ . कोल्हेनीं समाजाला दाखवून दिले.

पुरस्काराविषयी भूमिका व्यक्त करताना आमदार अरुण अण्णा लाड म्हणाले, क्रांतीअग्रणी डॉ जी डी ( बापू ) लाड हे कसे जगले, त्यांनी समाजासाठी दिलेले योगदान, त्यांनी केलेला त्याग नवीन पिढीला माहिती व्हावा, म्हणून समाजात असे अलौकिक काम करणाऱ्या व्यक्तींना क्रांतीअग्रणी पुरस्कार प्रदान करण्यात येतो. प्रथम क्रांतिअग्रणी डॉ . जी . डी . ( बापू ) लाड, क्रांतिवीरांगणा विजयकाकू लाड यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करणेत आले. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रताप लाड यांनी केले, पाहुण्यांचा परिचय जयवंत आवटे यांनी करुन दिला. निवेदन व मानपत्र वाचन श्रीकांत माने यांनी केले तर आभार कुंडलिक एडके यांनी मानले.

यावेळी ॲड. प्रकाश लाड, उद्योजक उदय लाड, दिलीप लाड, सचिन कदम (कोल्हापूर), जिल्हा परिषद सदस्य शरद लाड, नितीन नवले, प्रमिलताई लाड, अलकाताई लाड, मिनाक्षीताई लाड, सुनंदाताई लाड, धनश्रीताई लाड, साधना लाड, अंजली कदम, मनस्वीता पाटील, अपेक्षा लाड, सरपंच प्रमिला पुजारी, पंचायत समिती माजी उपसभापती सुरेश खारगे, प्राचार्य बी एन पवार, व्ही वाय पाटील, पी पी कुंभार, प्राचार्य कृष्णराव साळुंखे, सूर्यकांत देशमुख, विजय मोकाशी (सर्व सातारा), सुबराव पवार (गोंदी), डॉ पी टी पाटील (कुरळूप), ॲड आनंदराव जाधव (हिंगणगाव), प्रा.पांडुरंग शितोळे (विटा), यांचेसह क्रांती कारखाण्याचे संचालक, कर्मचारी, ग्रामपंचायत सदस्य, सर्व संस्थांचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

0 5 DEC 2021

केसरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महामानवांना समजून घेणे ही माणूस बनण्याच्या प्रक्रियेची सुरुवात

## – प्रा. शरद गायकवाड ; डॉ. आंबेडकर केंद्राच्या स्पर्धांचे पारितोषिक वितरण

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : महामानवांना समजून घेणे ही माणूस बनण्याच्या प्रक्रियेसाठीची महत्त्वाची सुरुवात आहे, असे प्रतिपादन विचारवंत प्रा. शरद गायकवाड यांनी नुकतेच येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. शिर्के म्हणाले, बाबासाहेबांचा ग्रंथप्रेमाचा आदर्श युवकांनी अंगीकारणे आवश्यक आहे. बाबासाहेबांचे हे ग्रंथप्रेम व अफाट वाचन यांचा वारसा आपण घेतला पाहिजे. तरच आपण स्वतःला परिपूर्ण माणूस म्हणून घडवू शकतो.



शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रातर्फे आयोजित पारितोषिक वितरण समारंभात बोलताना प्रा. शरद गायकवाड.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३० व्या जयंतीच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा ऑनलाईन घेण्यात आल्या. त्यातील विजेत्यांना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी प्रास्ताविक, डॉ. तेजश्री सावंत-मोहरेकर यांनी सूत्रसंचालन तर आभार प्रा. अविनाश भाले यांनी मानले. कार्यक्रमाला प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे, प्रा. डॉ. प्रकाश कुंभार, प्रा. डॉ. गिरीश मोरे, डॉ. दीपा श्रावस्ती, प्रा. अमोल मिणचेकर, डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. मुरली भानारकर, आनंद खामकर, तेजपाल मोहरेकर, सुशांत पंडित, विक्रम कांबळे उपस्थित होते.

0 5 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आयुष्यात कठीण प्रसंगांना तोंड द्या, नाविन्याचा शोध घ्या

## ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र कोल्हे यांना क्रांतीअग्रणी पुरस्काराचे वितरण : कामाशी प्रामाणिक राहण्याचे आवाहन

वार्ताहर
कुंडल

आयुष्यातील कठीण प्रसंगांना तोंड देऊन नाविन्याचा शोध घ्या. कठीण प्रसंग हे आपल्या आयुष्याला झळाळी देण्यासाठी येतात, असे प्रतिपादन डॉ. रवींद्र कोल्हे यांनी केले.

क्रांतिअग्रणी डॉ. जी डी बापू लाड यांच्या जन्मशताब्दी निमित्त 'क्रांतिअग्रणी पुरस्कार' त्यांना प्रदान करण्यात आला. मेळघाट या दुर्गम भागातील बैरागड येथे एक रुपयात वैद्यकीय सेवा पुरवण्याचे कार्य पत्नी स्मिता यांच्यासह केले आहे. या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



**कुंडल : क्रांतीअग्रणी पुरस्कार ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रविंद्र कोल्हे यांना प्रदान करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, आमदार अरुणअण्णा लाड.**

१ लाख रुपये, मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्कारचे स्वरुप आहे. आमदार अरुण लाड, जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, प्रा. जे. एफ. पाटील, ॲड. सुभाष पाटील उपस्थित होते.

डॉ. कोल्हे म्हणाले, मेळघाटात अनेक गोष्टी या लोकाभिमुख केल्या. त्यामुळे शेतकरी आत्महत्या अजिबात नाहीत. समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देणे आणि त्याच्या अडचणी सोडवणे यालाच धर्म म्हणतात आणि याच धर्माचे पालन मी आजवर करत आहे. वैद्यकीय शिक्षण घेताना मित्रांसोबत काढलेल्या सायकल सफरी दरम्यान ग्रामीण भागाचे खरे दर्शन झाले. याच प्रवासात खऱ्या जीवनाचा साक्षात्कार झाला. चिरंतन असे काहीच नाही, कोणतेही दिवस बदलण्यासाठी आलेले असतात. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत खचून जाऊ नका. आपल्या कामाशी प्रामाणिक राहिले पाहिजे, असे आवाहनही डॉ. कोल्हे यांनी केले.

कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, माणसांनी माणसासारखे वागले पाहिजे, भौतिक गोष्टींचा हव्यास तात्पुरता असतो. पण चिरंतन हे व्यक्तिमत्व असते ते सुधारले पाहिजे. वैद्यकीय सेवा पुरवतानाही साधी राहणी जपली जाते हे डॉ. कोल्हेनीं समाजाला दाखवून दिले.

आमदार अरुण लाड म्हणाले, क्रांतीअग्रणी डॉ जी. डी. बापू लाड यांनी समाजासाठी दिलेले योगदान, त्याग नवीन पिढीला माहिती व्हावा

पान ४ पहा

# आयुष्यात कठीण प्रसंगांना तोंड द्या, नाविन्याचा शोध घ्या

पान १ वरुन

म्हणून समाजात असे अलौकिक काम करणाऱ्या व्यक्तींना क्रांतीअग्रणी पुरस्कार प्रदान करण्यात येतो, असे सांगितले.

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रताप लाड यांनी केले. पाहुण्यांचा परिचय जयवंत आवटे यांनी करुन दिला. निवेदन व मानपत्र वाचन श्रीकांत माने यांनी केले तर आभार कुंडलिक एडके यांनी मानले.

ॲड. प्रकाश लाड, उद्योजक उदय लाड, दिलीप लाड, सचिन कदम (कोल्हापूर), जिल्हा परिषद सदस्य शरद लाड, नितीन नवले, प्रमिलताई लाड, अलकाताई लाड, मिनाक्षीताई लाड, सुनंदाताई लाड, धनश्रीताई लाड, साधना लाड, अंजली कदम, मनस्वीता पाटील, अपेक्षा लाड, सरपंच प्रमिला पुजारी, पंचायत समिती माजी उपसभापती सुरेश खारगे, प्राचार्य बी एन पवार, व्ही वाय पाटील, डॉ. पी पी कुंभार, गोविंदराव डुबल, प्राचार्य कृष्णराव साळुंखे, सूर्यकांत देशमुख, विजय मोकाशी (सर्व सातारा), सुबराव पवार (गोंदी), डॉ पी टी पाटील (कुरळूप), ॲड. आनंदराव जाधव (हिंगणगाव), प्रा. पांडुरंग शितोळे (विटा), यांच्यासह क्रांती कारखान्याचे संचालक, कर्मचारी, ग्रामपंचायत सदस्य, सर्व संस्थांचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.